**सेशन केस नं. ३३/१५**
**सा.क्र.३ निशाण क्र.४९**

**सरकारपक्षा तर्फे साक्षीदार क्र. ३ ची जबानी**

मी याद्वारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,
माझे नांव :— कमलेश वडिलांचे नांव :— रमेश वराडकर,
वय सुमारे :— ३५ वर्षे व्यवसाय :—खाजगी नोकरी,
रहाणार:— वायरी, मालवण, तालुका :—मालवण,
जिल्हा:— सिंधुदुर्ग.

........................

**सरतपासणी अभियोग पक्षातर्फे सरकारी अभियोक्ता श्री.जी.एम. तोडकरी, सरतपासणी**

दि.२९/११/२०१४ रोजी मी झाटये हॉस्पीटल येथे पंचनाम्यासाठी गेलो होतो. त्यावेळेस दुसरे पंच लुडबे हे देखील तेथे हजर होते. घटनास्थळ आम्हांला धुरी यांनी दाखविले.

**२.** भिलवडकरांच्या घराच्या गल्लीमध्ये शर्टाची दोन काळया रंगाची बटने पडलेली दिसली. ती बटने पोलिसांनी जप्त केली. मारहाणीच्या वेळीला श्री. विठ्ठल धुरी यांच्या शर्टाची बटने पडलेली होती. आम्हांला भिलवडकरांच्या घराच्या पाठीमागे संडासच्या बाजूला काळया रंगाची शिट्टी व क्लीप दिसली. ते पोलिसांनी जप्त केले. आम्हांला नारळ व चिकूची झाडे देखील तेथे दिसली. त्यानुसार घटनास्थळ पंचनामा केला. पंचनाम्यावर माझ्या दोन सहया घेतल्या. आता मला सदरचा पंचनामा दाखविला, तो तोच आहे, मजकूर खरा व बरोबर आहे, त्यावर माझ्या सहया आहेत त्यास **नि.क्र.५०** देण्यात आले.

३. मला मुद्देमाल बटने दाखविल्यास मी ओळखू शकतो. आता मला मुद्देमाल बटने दाखविली, ती तीच आहेत. त्यास **अर्टिकल —२** देण्यात आले. बटने जप्त केलेल्या पाकीटाच्या लेबलवर देखील मी सही केली. मला आता ती

सही दाखविली ती तीच आहे. आता मला जप्त केलेली काळया रंगाची शिट्टी दाखविली, ती तीच आहे, शिट्टीच्या जप्त केलेल्या पाकीटाच्या लेबलवर देखील मी सही केली, मला आता ती सही दाखविली ती तीच आहे, त्यास **अर्टिकल—३** देण्यात आले. आता मला शिट्टीची क्लीप दाखविली, ती तीच आहे, जप्त केलेल्या क्लीपच्या पाकीटाच्या लेबलवर माझी सही आहे, ती तीच आहे, त्यास **अर्टिकल—४** देण्यात आले.

**उलटतपास आरोपी क्र.१, ४ व ५ तर्फे वकील श्री.एस.डी.देसाई यांचा**

४. सकाळी आठ ते सव्वाआठचे दरम्यान मी घटनास्थळी पोहोचलो. मी जेव्हा घटनास्थळी पोहोचलो तेव्हा फिर्यादी, पोलीस आणि दुसरे पंच तेथे आधीच हजर होते. माझे घर घटनास्थळापासून ३ कि.मी. अंतरावर आहे. त्यावेळेस मी तेथून जात असताना मला पंच म्हणून राहण्यास सांगितले. केराम नावाच्या पोलिसांनी मला पंच म्हणून राहण्यास सांगितले. हे म्हणणे खरे नाही की, मी घटनास्थळावर गेलो त्यावेळी पोलिसांनी आधीच पंचनामा सुरू केला होता. मी घटनास्थळावर साडेनउ वाजेपर्यंत होतो. पंचनामा चालू असताना फिर्यादी धुरी बाहेर गेले असे घडले नाही. पंचनाम्यातील मजकूर फिर्यादी धुरी पोलिसांना सांगत होते आणि त्याप्रमाणे पोलिसांनी पंचनामा लिहिला. पंचनाम्यावर माझ्या समक्ष फिर्यादी धुरी यांची सही घेतली. फिर्यादी धुरी यांनी मुद्देमाल अर्टिकल जप्त केलेल्या लेबलवर देखील आमच्या समोर सही केली. हे म्हणणे खरे नाही की, माझ्यासमोर कोणताही पंचनामा झाला नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझे समोर कोणतेही मुद्देमाल अर्टिकल जप्त केले नाहीत.

आरोपी क्र.१,४ व ५ तर्फे सा.क्र.३ चा उलटतपास पुर्ण.

**उलटतपास आरोपी क्र. २ तर्फे वकील श्री.वाय.आर.खानोलकर यांचा**

५. आरोपी क्र.१, ४ आणि ५ यांचेतर्फे घेण्यात आलेला उलटतपास स्विकारला.

**<u>उलटतपास आरोपी क्र. ३ तर्फे वकील श्री.व्ही.पी.चिंदरकर यांचा</u>**

६. प्रस्तुतचा पंचनामा मी वाचून पाहिलेला नाही. साक्षीदार पुन्हा असे सांगतात की, त्यांनी पंचनाम्यातील मजकूर वाचला आणि मग त्यावर सही केली. नि.क्र.५० चे पंचनाम्यामध्ये मी मालवण बाजारपेठेतून जात असताना पोलिसांनी मला थांबविले असा मजकूर नमूद नाही. मी पोलिसांना, मी रस्त्यावरून जात असताना त्यांनी मला थांबविले असा मजकूर पंचनाम्यात लिहा असे सांगितले नाही.

७. हे म्हणणे खरे नाही की, नि.क्र.५० चे पंचनाम्यामधील पोर्शन मार्क 'अे' चुकीचा आहे. हे म्हणणे खरे आहे की, पोलिसांनी मला लेखी सूचना देवून पंचनाम्यासाठी बोलाविले असे घडले नाही. हे मला आठवत नाही की, माझ्यासमोर मापे घेतली नाहीत किंवा ती कोणत्या साधनाने घेतली हे माहीत नाही त्यामुळे त्याबाबत मी सरतपासात सांगितले नाही. हे म्हणणे खरे आहे की, भुयारी गटाराचे खोदकाम चालू असल्यामुळे सगळीकडे धूळ पसरलेली होती. हे म्हणणे खरे आहे की, अर्टिकल नं. २ ते ४ वर धूळ जमा झालेली नव्हती. साक्षीदार स्वत:हून सांगतात की, अर्टिकल्स् ही रस्त्यावर पडलेली नव्हती घराच्या आतील कंपाउंडजवळ पडलेली होती. हे म्हणणे खरे आहे की, नि.क्र.५० च्या पंचनाम्यात धुळीचा उल्लेख नाही. हे म्हणणे खरे आहे की, मुद्देमाल बटन अर्टिकल—२ वर विशिष्ट ओळखीची खुण नाही. हे म्हणणे खरे नाही की, मुद्देमाल शिट्टी आर्टिकल—३ वर विशिष्ट ओळखीची खुण नाही.

(मुद्देमाल अर्टिकल—३ शिट्टी पंचांना दाखवून खालील प्रश्न आरोपींच्या विद्वान विधिज्ञांतर्फे पंचांना विचारणेत आला.)

प्रश्न— मुद्देमाल शिट्टी अर्टिकल —३ वर विशिष्ट ओळखीची खुण आहे का? आणि त्याचा उल्लेख पंचनाम्यात केलेला आहे का ?

उत्तर — शिट्टी तुटलेली आहे तीच त्याची खुण आहे. क्लीप तुटलेली शिट्टी हे वर्णन सोडून पंचनाम्यात इतर कोणतेही शिट्टीच्या ओळखीचे वर्णन करण्यात आलेले नाही.

८. हे म्हणणे खरे नाही की, पंचनामा माझ्या समोर झालेला नसल्यामुळे पंचनाम्याने जप्त केलेल्या मुद्देमाल वस्तू मी पाहिलेल्या नाहीत. पंचनाम्यापुर्वी मी अॅल्युमिनिअम व लोखंडाच्या वस्तू पाहिलेल्या आहेत. हे म्हणणे खरे आहे की, लोखंड गंजते अॅल्युमिनिअम गंजत नाही. हे म्हणणे खरे आहे की, मुद्देमाल अर्टिकल—४ गंजलेले आहे. हे म्हणणे खरे आहे की, अर्टिकल नं.४ चे दोन तुकडे आहेत. हे म्हणणे खरे आहे की, नि.क्र.५० च्या पंचनाम्यात मुद्देमाल अर्टिकल नं.४ चे दोन तुकडे आहेत असे नमूद केलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, मुद्देमाल अर्टिकल नं.४ च्या ओळखीच्या विशिष्ट खुणेचे वर्णन नि.क्र.५० च्या पंचनाम्यात नाही.

९. हे म्हणणे खरे आहे की, नि.क्र.५० च्या पंचनाम्यामधील परिच्छेद नं. ११ मधील तारखेला गिरविलेले आहे. हे म्हणणे खरे नाही की, भिलवडकरांच्या जागेमध्ये मुद्देमाल वस्तु मिळाल्या असे मी खोटे सांगतो. हे म्हणणे खरे नाही की, पोलिसांनी पंचनाम्यावर माझ्या सहया पोलीस स्टेशनमध्ये घेतल्या. हे म्हणणे खरे नाही की, पोलिसांच्या सांगणेवरून खोटी साक्ष देत आहे.

आरोपी क्र.३ तर्फे सा.क्र.३ चा उलटतपास पुर्ण.

फेरतपास नाही.

स्वाक्षरी/—

दिनांक—२८/०६/२०२२

(श्रीमती सानिका एस. जोशी)
अतिरिक्त सत्र न्यायाधीश,
सिंधुदुर्ग—ओरोस.